**ठळक बातम्या**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैसे वाढ
- पाच देशांच्या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात प्रधानमंत्री आज भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार
- छत्तीसगडमध्ये जगदलपूर इथे केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली मध्य विभागीय परिषदेची उच्चस्तरीय बैठक सुरू
- भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर सोडून द्यावं ही मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं निधन

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आज प्रति लिटर ९० पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीतली ही दुसरी दरवाढ आहे. दिल्लीमध्ये आता पेट्रोलचा दर ९८ रुपये ६४ पैसे, तर डिझेल ९१ रुपये ५८ पैसे, मुंबईत पेट्रोल १०७ रुपये ५९ पैसे आणि डिझेल ९४ रुपये ८ पैसे, कोलकात्यात पेट्रोल १०९ रुपये ७० पैसे आणि डिझेल ९६ रुपये ७ पैसे, तर चेन्नईमध्ये पेट्रोल १०४ रुपये ४९ पैसे आणि डिझेलचा दर ९६ रुपये ११ पैसे प्रति लिटर इतका आहे.

अमेरिका आणि इस्त्राएलनं इराणमध्ये छेडलेला संघर्ष आणि त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेल वाहतुकीत आलेला व्यत्यय, यामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किमतीने उसळी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली.

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ९० पैसे वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकार जनतेची लूट करत असून विशिष्ट उद्योगपतींनाच सूट देत आहे असा आरोप त्यांनी केला. जनतेला

काटकसरीचा सल्ला देऊन सरकार जनतेवर महागाईचा भार टाकत आहे ,अशी टीका खरगे यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात ते आज भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, संरक्षण, शाश्वतता आणि व्यापार यासारख्या क्षेत्रांमध्ये नॉर्डिक राष्ट्रांबरोबरची भारताची धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करणं, हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी काल भारत-नॉर्वे व्यापार आणि संशोधन परिषदेत दोन्ही देशांच्या अग्रगण्य उद्योगपती आणि संशोधकांना संबोधित केलं. उभय देशांमधल्या ऐतिहासिक आर्थिक संबंधांना एका नव्या उंचीवर नेण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. भारतातले प्रतिभावान आणि महत्त्वाकांक्षी तरूण, आणि गुंतवणूकस्नेही नियामक चौकटींमुळे नॉर्वेच्या कंपन्यांना मोठी संधी उपलब्ध आहे, उद्योजकांनी नॉर्वेचं विशेष कौशल्य आणि भारतातल्या हरित आणि नील अर्थव्यवस्थेतल्या संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी केलं. २०३० पर्यंत भारताने ५ हजार गिगावॉट स्वच्छ ऊर्जा निर्मितीचं उद्दिष्ट ठेवलं असून नॉर्वेनं यासाठी सहकार्य करावं असं प्रधानमंत्री म्हणाले.

- - - **होल्ड -बाईट- मोदी** - - -

त्याआधी प्रधानमंत्र्यांनी नॉर्वेचे प्रधानमंत्री जोनास गहर स्टोर यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवणं, हरित धोरणात्मक भागीदारी दृढ करण्यावर दोन्ही नेत्यांनी सहमती दर्शवली. तसंच व्यापार आणि गुंतवणूक, नवीकरणीय ऊर्जा, विज्ञान आणि तंत्रज्ञान, नील अर्थव्यवस्था, चक्रीय अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, अंतराळ आदी क्षेत्रातलं सहकार्य वृद्धिंगत करण्याविषयी दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.

प्रधानममंत्री मोदी यांना नॉर्वेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट' काल प्रदान करण्यात आला. नॉर्वेचे महाराज राजे हेराल्ड पाचवे यांनी एका विशेष सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान केला.

दरम्यान, आपल्या दौऱ्याच्या पाचव्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी आज इटलीला रवाना होतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये जगदलपूर इथे केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली मध्य विभागीय परिषदेची उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. ही या परिषदेची सव्विसावी बैठक असून यातउत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री सहभागी झाले आहेत. तसंच, केंद्रीय गृह सचिव, गुप्तचर विभागाचे संचालक, चारही राज्यांचे पोलीस महासंचालक यांच्यासह वरिष्ठ पोलीस आणि प्रशासकीय अधिकारीही या बैठकीला उपस्थित आहेत.

**<><><><><>**

सार्वजनिक ठिकाणी पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर पुन्हा सोडून दिलं जाऊ नये, हा यापूर्वी दिलेला आपला आदेश मागे घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. नोव्हेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या या आदेशात सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिका न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं फेटाळल्या आणि अशा कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्येच ठेवण्याचे निर्देश दिले.

भटक्या कुत्र्यांनी यापूर्वी लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि पादचाऱ्यांवर हल्ले केले असून, ही गंभीर समस्या आता विमानतळ आणि निवासी संकुलांपर्यंत पोहोचल्याचं न्यायालयानं नमूद केलं, आणि आपल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना अवमान आणि शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरं जावं  लागेल, असा इशारा दिला.

राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी प्राणी जन्म नियंत्रण केंद्र स्थापन करावीत, रेबीज प्रतिबंधक लसींची उपलब्धता वाढवावी, तसंच रेबीजग्रस्त किंवा धोकादायक कुत्र्यांबाबत कायद्याच्या कक्षेत असलेल्या उपाययोजना करण्याचे निर्देशही दिले.

**<><><><><>**

देशातली सर्व प्रकारची न्यायाधिकरणं आणि समन्यायिक संस्थांचं  कामकाज अखंडितपणे सुरू राहावं यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आज  न्यायाधिकरण आणि समन्यायिक संस्थांचे अध्यक्ष, सभापती आणि सदस्यांचा कालावधी ८ सप्टेंबर पर्यंत वाढवला. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या एका सदस्या या संदर्भात दाखल केलेल्या प्रलंबित खटल्यात सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, जॉयमाल्य बागची आणि विपुल पांचोली यांच्या पीठाने हा आदेश दिला.

<><><><><>

इलॉन मस्क आणि ओपनएआय या कंपनी दरम्यानच्या खटल्यावर नुकत्याच झालेल्या सुनावणीमध्ये कॅलिफोर्निया इथल्या  एका न्यायालयानं  ओपनएआयच्या बाजूने निकाल दिला. ओपनएआयने मानवतेच्या हितासाठी काम करण्याच्या आपल्या आश्वासनापासून माघार घेतल्याचा मस्क यांचा दावा न्यायालयानं फेटाळला. २८ एप्रिल पासून या खटल्यावर सुनावणी सुरु आहे. कंपनीने आपली जुनी तत्त्वं सोडून दिली असून, केवळ नफा कमवण्यावर आणि  आपल्या गुंतवणूकदारांना श्रीमंत करण्यावर लक्ष केंद्रित केल्याचा मस्क यांचा आरोप आहे. इलॉन मस्क आणि ओपनएआय कंपनीचे सीईओ सॅम ऑल्टमन यांच्यातल्या न्यायालयीन लढाईमुळे, एआय तंत्रज्ञानावर कोणाचं नियंत्रण असावं, आणि त्याचा विकास कोणत्या गतीनं व्हावा, या विचारांना जगभरात चालना मिळाली आहे.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं आज देहराडून इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९५४ मधे लष्करात दाखल होऊन ते १९९१ मधे  मेजर जनरल पदावरुन निवृत्त झाले. १९८३ मधे त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत गढवाल मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधित्व केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचं मंत्रीपद त्यांनी सांभाळलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातला सुवर्ण चतुष्कोण प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात साकार झाला. २००७ ते २००९ आणि २०११ ते २०१२ असे दोन वेळा ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री होते.

<><><><><>

मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात आज दिवसभर उष्णतेची तीव्र लाट राहील असा अंदाज आहे. आंध्र प्रदेशचा किनारपट्टी भाग आणि ओडिशामध्ये आज दिवसा उष्ण आणि दमट हवामान राहील, तर विदर्भ, आणि राजस्थानमध्ये आज रात्री उष्णतेची लाट राहील असा अंदाज आहे.

अंदमान आणि निकोबार द्वीप समुह, केरळ, माहे, लक्षद्वीप, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकल या भागात आज  मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

तर, बिहार, पश्चिम बंगालचा गंगेच्या खोऱ्यातला प्रदेश, ओडिशा, झारखंड, तेलंगणा, जम्मू आणि काश्मीर, तसंच  ईशान्य भारताच्या काही भागांत आज मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**